# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक १६.०८.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १५.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ४९ केसेसमध्ये ५१ ईसमावर कारवाई करून एकुण ६,२४,३८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०६ केसेसमध्ये ४४ इसमांवर कारवाई करुन ३,३८,४४०/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,९४१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ८७,७००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १५.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १६.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०३** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस. एकुण १९,६५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त.**

दिनांक ०३.०३.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ०१.०४.२०२६ चे १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, २५० यर्जुवेद, दिक्षीत नगर, कपिलनगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी महेश दयालदास मोटवाणी, वय ६३ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलाचे घरी बॅगलोर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने, चांदीचे सिक्के, डायमंड वॉच असा एकुण किंमती ८,३८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व पोअं. विरेंद्र पांडे यांना विश्वसनिय गुप्त बातमीदाराचे मार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न करून, सापळा रचुन आरोपी नामे १) किशोर राहुल करवाडे, वय १९ वर्षे, रा. चिखली चौक, कळमना, नागपुर २) आर्यन राधेशाम मेश्राम, वय २० वर्षे, रा. नागेश्वर नगर, पारडी, नागपुर ३) संतोष शंकरलाल धामगाये, वय ५२ वर्षे, रा. अंबे नगर, पारडी, नागपुर ४) श्रीमती संगीता राहुल करवाडे, वय ३६ वर्षे, रा. चिखली चौक, कळमना, नागपुर यांना ताब्यात घेवुन, त्यांना विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद

घरफोडीचा गुन्हा पाहीजे आरोपी ५) फरदीन नावाचे इसमासोबत संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन रोख १,७०,०००/—रू., सोन्याचे दागिने व सिक्के वजनी ६ तोळे, सोन्याची लगड ९० ग्राम, चांदीचा सिक्का वजनी ५० ग्राम, ०१ मोपेड गाडी, वरना कार खरेदीचे कागदपत्रे, प्लॉट खरेदीचे कागदपत्रे, बॅकेचे पासबुक, ०४ मोबाईल फोन असा एकुण १९,६५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कराडे, सपोनि. सचिन गायकवाड, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. नारायण पारवेकर, चंद्रशेखर भारती, पोअं. विरेंद्र पांडे, रविंद्र राऊत, निलेश श्रीपात्रे, प्रफुल्ल पारधी, लक्ष्मीकांत सोनटक्के, अजींक्य घुले, राहुल पाटील, हंसराज ठाकुर व मनिष मिश्रा यांनी केली.




**<u>३) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक १६.०८.२०२६ चे ००.३० वा. ते ०२.३० वा. चे दरम्यान, यशोधरानगर पोलीसांचे पथक पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत पांडेवस्ती कडे जाणाऱ्या रोडवर तीन ईसम काळ्या रंगाचे ॲक्टीवा मोपेड दुचाकी असुन त्यांचेकडे अंमली पदार्थ आहे. अशा माहीतीवरून सापळा रचुन, निलगीरी अपार्टमेंट समोर ऑटोमोटीव्ह मेट्रोस्टेशन जवळ एका दुचाकीजवळ मिळालेल्या वर्णनाचे ईसम दिसुन आल्याने त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) रितीक हमेदास उपवंशी, वय २४ वर्षे, २) पियुष उमेश वाघ, वय १८ वर्षे, ३) देवांग विजय सोनारे, वय १८ वर्षे, सर्व रा. पांडेवस्ती, यशोधरानगर, नागपुर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण २८.६९ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०३ मोबाईल व होंडा ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच. ४९ सिटी ४३५७ असा एकुण ३,१८,४५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२१(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंद्रे, पोअं. संदीप वानखेडे, मनिष झरकर, क्षितेश चौरसिया, भुषण येरोजवार, मनोज गवई व संदीप सबळे यांनी केली.

**४) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगीरी :— अवैध दारू बाळगुन वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०८.२०२६ चे १७.०० वा. गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, गौसी मानापुर, तिरूपती ले—आऊट मधील रोडवर सापळा रचुन एका मोटारसायकल व स्कुटी गाडीवरून जाणाऱ्या तीन ईसमांना थांबवुन पंचासमक्ष त्यांना त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) देवांशु अशोकराव कावळे, वय २० वर्षे, रा. मुंगसाजी नगर, दिघोरी नाका, नागपुर २) क्रिष राजु निरगुळे, वय १९ वर्षे, रा. नागमंदीर जवळ, दिघोरी नाका, हुडकेश्वर, नागपुर ३) अजय संतोष पाल, वय १८ वर्षे, रा. सिध्दी विनायक लॉन जवळ, दिघोरीनाका, नागपुर असे सांगीतले. त्यांचे वाहनाची झडती घेतली असता, आरोपी क्र. १ याचे ताब्यातुन हातभट्टी दारूने भरलेल्या ५०० मि.ली. च्या १४ नग बिसलेरी बॉटल व आरोपी क्र. ३ चे ताब्यातुन हातभट्टी दारूने भरलेल्या ५०० मि.ली. च्या २५ नग बिसलेरी बॉटल मिळुन आल्या. आरोपींचे ताब्यातुन रोख, हातभट्टीची दारू, ०२ आयफोन, ०१ मोबाईल फोन, स्प्लेंडर मोटारसायकल, स्कुटी मोपेड असा एकुण २,६४,६६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता अवैद्यरित्या दारूचा साठा बाळगुन वाहतुक करतांना समक्ष मिळुन आल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हिंगणा येथे कलम ६५(अ)(इ) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहेत. आरोपींना मुद्देमालासह हिंगणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे व त्यांचे पथकाने केली.



**५) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक १५.०८.२०२६ चे १८.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, डब्ल्यु सिएल कॉलोनी, वलनी, बि टाईप, घाटे याचे झोपड्यामध्ये एक ईसम शस्त्रासह बसलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले.

त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पवन उर्फ बोडी नरेश नेवारे, वय २८ वर्षे, रा. वार्ड नं. ०४, कुचक मोहल्ला, पिपळा डाक बंगला जवळ, खापरखेडा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता किंमती १,०००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे खापरखेडा येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०२/२०२६, दिनांक २३.०३.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महीन्याकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपींस मुद्देमालासह खापरखेडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कराडे, पोहवा. नारायण पारवेकर, पोअं. दिनेश महल्ले, सुनिल यादव व हंसराज ठाकुर यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे गणेशपेठ :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी आकाश केशव पटले, वय २८ वर्षे, रा. शिवाजी पुतळ्याजवळ, जयकमल कॉम्प्लेक्स मधील सेक्युरिटी गार्ड चे रूममध्ये, कोतवाली, नागपुर हा त्याचा मित्र अक्षय प्रकाश शेट्टे, वय २८ वर्षे, रा. अत्तरओळ, शिवाजी पुतळ्याजवळ, कोतवाली, नागपुर व अंकीत जितेंद्रसिंग चव्हाण, वय २७ वर्षे, रा. झेंडा चौक, महाल, नागपुर असे तिघे अक्षयचा भाऊ नामे मयुर प्रकाश शेट्टे, वय ३३ वर्षे हा दारू पिवुन घरी त्याचे आजीला मारहाण करतो. करीता त्यास शोधत असतांना पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत अशोक चौक ते शिवाजी पुतळ्यादरम्यान मोरघडे होमियोपॅथी क्लीनीक समोर त्यांचे दुचाकीला मागुन येणाऱ्या मोपेडचालकाने धडक देवुन त्यावरील आरोपी १) रितेश उर्फ सोनु प्रल्हाद डेंगे, वय वर्षे, रा. अमृता पॅलेस जवळ, गाडीखाना, शिवाजी पुतळ्याजवळ, गणेशपेठ, नागपुर २) अमोल उर्फ भुऱ्या सुरेश खुरसोड, रा. केडीके कॉलेजजवळ, नंदनवन, नागपुर, ३) अर्पीत ईश्वर बुधे, रा. कर्नलबाग मस्जीदजवळ, गणेशपेठ, नागपुर यांनी ४) मयुर शेट्टे याचे संगणमताने आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादी व त्याचे मित्रांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीस हातावर, अंकीत चव्हाण यास हातापायावर मारून तसेच अक्षय शेट्टे याचेवर धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले. जखमींना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक

१६.०८.२०२६ चे ०९.०१ वा. डॉक्टरांनी अक्षय शेट्टे यास तपासुन मृत घोषित केले. फिर्यादी व अंकीत चा उपचार सुरू आहे.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपींविरुध्द कलम १०९(१),३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. उपचारादरम्यान जखमी यास मृत घोषीत केल्याने गुन्ह्यामध्ये कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** दिनांक १६.०८.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत पिसिएमटी पोलीस वसाहत, बिल्डींग नं. २, क्वार्टर नं. एफ ०२, काटोल चौक, पोलीस लाईन टाकळी येथे राहणारे सपोनि. ज्ञानेश्वर अंकुशराव झोल, वय ३५ वर्षे यांनी त्यांचे राहते घरी हॉलमध्ये कोणतेतरी अज्ञात कारणावरुन साडीचे सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. यापकरणी फिर्यादी श्रीमती पुजा ज्ञानेश्वर झोल, वय ३३ वर्षे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. खुटवळ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

सपोनि. ज्ञानेश्वर अंकुशराव झोल हे पोलीस आयुक्त कार्यालय, नागपुर शहर येथील अर्जशाखेत कार्यरत होते. त्यांच्या मनमिळावु स्वभावामुळे ते सहकाऱ्यांमध्ये आवडते होते. त्यांचे अचानक निधनामुळे सर्वांना धक्का बसलेला असुन नागपुर शहर पोलीस दलाने एक कर्तव्यदक्ष व प्रामाणीक अधिकारी गमावलेला आहे. त्यांचे पश्चाात कुटुंबात त्यांच्या पत्नी व जुळे मुलगा व मुलगी वय साडेतीन वर्ष असे आहेत. नागपुर शहर पोलीस आयुक्तालयातर्फे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली देण्यात येते.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**